॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade
NAAC Re-accredited
(4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon


## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. ८ (प्रतिनिधी) :कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम हॅन्ड्स ऑन ट्रेनिंग ऑन रिसर्च इक्विपमेंट हा महाराष्ट्र राज्य शिक्षक विकास संस्था, पुणे यांच्या माध्यमातून व संचालक, जैवशास्त्र प्रशाळा यांच्या समन्वयातून दि. 3 ऑगस्ट ते 8 ऑगस्ट या दरम्यान आयोजित करण्यात आला. याचे उद्घाटन कुलगुरू प्रा. विजय माहेश्वरी यांनी दिनांक 3 ऑगस्ट रोजी सकाळी दहा वाजता केले. कुलगुरूंनी अशा कार्यशाळा संशोधनासाठी किती महत्त्वाचे आहे यावर मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की संपूर्ण देशामध्ये फक्त महाराष्ट्र राज्य असे आहे की जेथे शिक्षक विकास संस्था आहे.

या कार्यशाळेसाठी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून म्हणजेच गोंदिया, धुळे, सिंधुदुर्ग, नाशिक, सोलापूर, पुणे, गडचिरोली, वाशिम, छत्रपती संभाजी नगर, जळगाव, मुंबई या विविध शहरांमधून व जिल्ह्यांमधून 35 प्राध्यापकांनी आपला सहभाग नोंदवला. त्यानंतर जैवशास्त्र प्रशाळा येथे विविध विषयांवर ती प्राध्यापकांनी मार्गदर्शन केले आणि दुपारच्या सत्रात त प्राध्यापक यांना उपकरणांची ओळख करून देण्यात आली व वापरण्याची संधी दिली.

**दुसऱ्या दिवशी** रसायनशास्त्र प्रशाळेमध्ये प्रा. दीपक दलाल आणि त्यांचे सहकारी यांनी विविध उपकरणांवरती माहिती दिली आणि वापरण्याची संधी दिली. **तिसऱ्या दिवशी** भौतिकशास्त्र प्रशाळेमध्ये विविध उपकरणांची ओळख आणि ज्ञान प्रदान करण्यात आले त्याशिवाय इंक्युबेशन सेंटर ची ओळख संध्याकाळी करून दिली व डॉ. चंद्रशेखर वाणी आणि विजय आहेर यांनी ज्ञानस्त्रोत केंद्राची माहिती दिली. **चौथ्या दिवशी** स्कूल ऑफ मॅथेमॅटिकल सायन्स गणित शास्त्र प्रशाळा येथे संशोधनासाठी संख्याशास्त्रात मिनी टॅब या विषयावर प्रा. रामकृष्ण शिंदे आणि प्रा. कीर्ती कमलजा यांनी मार्गदर्शन केले. तदनंतर संगणकशास्त्र प्रशाळेचे संचालक, प्रा. राकेश रामटेके आणि विनीत काकडे यांनी संशोधनासाठी लागणारे विविध सॉफ्टवेअर याची माहिती करून दिली. नंतर औद्योगिक संस्थांमध्ये विविध उपकरणांचा वापर कसा केला जातो आणि औद्योगिक संस्था उर्फ कंपनी कशी चालते याचे मार्गदर्शन दिले. जैन इरिगेशन सिस्टीम लिमिटेड येथे भेट देऊन टिशू कल्चर, फ्युचर फार्मिंग लॅबोरेटरी यांची माहिती देण्यात आली. **पाचव्या दिवशी** विद्यापीठ रसायन तंत्रज्ञान संस्था येथे भेट दिली आणि प्रा. ए.के. गोस्वामी यांनी आणि त्यांच्या चमुने विविध विषयांवर विविध उपकरणांवरती माहिती दिली. **शेवटच्या सहाव्या दिवशी** पर्यावरण शास्त्र प्रशाळेमध्ये पर्यावरणाशी निगडित अभ्यास करण्यासाठी आवश्यक असलेले उपकरणांची माहिती प्रा. संजय अत्तरदे व सहकारी यांच्यातर्फे देण्यात आली.

याशिवाय उद्योजकता विकास यावर डॉ. नवीन खंडारे आणि बौद्धिक संपदा अधिकार म्हणजेच पेटंट का व कसे फाईल करावे या विषयीचे ज्ञान प्रा. विकास गीते यांनी दिले आणि या कार्यक्रमांमध्ये प्रा. मनीष जोशी यांनी आपल्या संस्थेला किंवा कॉलेजला विशेष प्राविण्य कसे मिळवून द्यावे आणि यासाठी कसे प्रयत्न करावे यावर एक विशेष सत्र घेण्यात आले. शेवटच्या दिवशी प्र- कुलगुरू प्रा. सोपान इंगळे यांच्या हस्ते निरोप समारंभ देण्यात आला व सर्व प्राध्यापकांना प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. सहभागी प्राध्यापकांनी आपल्या मनोगतात हे सांगितले की अशा प्रकारच्या कार्यशाळेस आम्ही प्रथमच उपस्थित राहिलो आणि ही कार्यशाळा आमच्या पुढील आंतरविद्याशाखीय संशोधनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

**बातमी नं. २**

जळगाव, दि. ८ (प्रतिनिधी) :शासकीय माध्यमिक आश्रम शाळा, सोनबर्डी येथे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या योगशास्त्र विभाग यांच्या वतीने आदिवासी विभागातील विद्यार्थिनींच्या आरोग्यविषयक जनजागृतीसाठी विशेष मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील योगशास्त्र विभाग प्रमुख, इंजि. राजेश पाटील सर तसेच प्रा. डॉ. लीन्ता चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी मान्यवरांनी विद्यार्थिनींना योगाचा शारीरिक व मानसिक आरोग्यावर होणारा सकारात्मक परिणाम, दैनंदिन जीवनातील योगाचे महत्त्व, योगासने, प्राणायाम आणि ध्यान याबाबत मार्गदर्शन केले. नियमित योगाभ्यासामुळे शरीराची लवचिकता, कार्यक्षमता व प्रतिकारशक्ती वाढण्यास तसेच तणाव, चिंता आणि मानसिक अस्वस्थता कमी करण्यास मदत होते, याबाबत विद्यार्थिनींना माहिती देण्यात आली.

तसेच कार्यक्रमामध्ये मासिक पाळीच्या काळातील आरोग्य व स्वच्छता, त्या काळात घ्यावयाची काळजी, योग्य आहार, मानसिक स्वास्थ्य आणि मासिक पाळीशी संबंधित गैरसमज याविषयीही सविस्तर व शास्त्रीय पद्धतीने मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थिनींनीही उत्स्फूर्त सहभाग घेत प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. या मार्गदर्शनामुळे विद्यार्थिनींमध्ये आपल्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण झाली असून, नियमित योगाभ्यास, योग्य आहार, स्वच्छता आणि सकारात्मक विचारसरणी यांचे महत्त्व त्यांना समजले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे मुख्याध्यापक, श्री. भूषण बी.पाटील तसेच शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांचे व मार्गदर्शकांचे शाळेच्या वतीने मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

………………………………………………………………………………………………………………………………………

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ८ ऑगस्ट, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी, जळगाव

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. ८ ऑगस्ट : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या जैवप्रशानेमार्फत सुरू करण्यात आलेल्या 'केळी निर्यात व्यवस्थापन प्रमाणपत्र अभ्यासक्रमास' आजपासून प्रारंभ झाला. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. विजय माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. सोपान इंगळे तसेच जैन इरिगेशन सिस्टीम् लिमिटेडचे वरिष्ठ उपाध्यक्ष व केळी तज्ज्ञ डॉ. के. बी. पाटील, जळगाव यांच्या प्रमुख उपस्थितीत सकाळी ११ वाजता या अभ्यासक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या पहिल्या बॅचमध्ये ३० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

यावेळी मार्गदर्शन करताना कुलगुरू प्रा. विजय माहेश्वरी म्हणाले की, जगभरात एखाद्या चांगल्या ब्रँडच्या उत्पादनाची गुणवत्ता सर्वत्र सारखीच असते. भारत हा जगातील प्रमुख केळी उत्पादक देशांपैकी एक असूनही केळीच्या निर्यातीच्या बाबतीत अपेक्षित प्रगती झालेली नाही, याकडे लक्ष वेधून कुलगुरूंनी सांगितले की, जळगाव जिल्ह्याची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर केळी पिकावर अवलंबून आहे. उत्पादनाच्या गुणवत्तेसोबतच त्याचे मानकीकरण, पॅकेजिंग, साठवणूक, वाहतूक आणि निर्यात व्यवस्थापन याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. विद्यापीठ हे कृषी विद्यापीठ नसले, तरी जिल्ह्याच्या सामाजिक व आर्थिक विकासातील केळीचे महत्त्व लक्षात घेऊन विद्यापीठाच्या सल्लागार समितीच्या मार्गदर्शनानुसार हा अभिनव प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे.

या अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना केळी उत्पादनापासून ते जागतिक बाजारपेठेपर्यंतच्या संपूर्ण मूल्यसाखळीचे शास्त्रीय व व्यावहारिक ज्ञान दिले जाणार आहे. केळीची गुणवत्ता, काढणीपश्चात व्यवस्थापन, पेडिंग, पॅकेजिंग, साठवणूक, वाहतूक, निर्यात प्रक्रिया, आंतरराष्ट्रीय बाजारपेठ, निर्यातविषयक नियम व मानके याबाबत विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे.

आगामी तीन महिन्यांच्या कालावधीत विविध विषयांवरील तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित केली जाणार असून, त्यानंतर विविध ठिकाणी प्रत्यक्ष प्रात्यक्षिके व क्षेत्रभेटींचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यामुळे अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक ज्ञान न मिळता केळी निर्यातीच्या प्रत्यक्ष प्रक्रियेचा अनुभवही मिळणार आहे.

या अभ्यासक्रमातून केळी निर्यात क्षेत्रासाठी कुशल मनुष्यबळ तयार होण्यास मदत होईल. प्रशिक्षित मनुष्यबळाच्या माध्यमातून जळगाव जिल्ह्यात उत्पादित होणाऱ्या केळीची गुणवत्ता सुधारून ती आंतरराष्ट्रीय मानकांनुसार निर्यात करण्याची क्षमता वाढेल. परिणामी केळी उत्पादक शेतकऱ्यांना अधिक चांगली बाजारपेठ उपलब्ध होऊन जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यास मदत होईल, असा विश्वास पावेळी व्यक्त करण्यात आला.

या उपक्रमामुळे 'जळगावची केळी ते जागतिक बाजारपेठ' या संकल्पनेला बळ मिळणार असून, केळी उत्पादन क्षेत्राला आधुनिक निर्यात व्यवस्थापनाची जोड देण्याच्या दिशेने विद्यापीठाने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे.

........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ८ ऑगस्ट, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी, जळगाव

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता